**मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.नागपूर यांच्या निवासस्थानाच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र.जिपई-२००८/प्र.क्र.२११/पं.रा.७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ८ जुलै, २००८.

**संदर्भ :-** मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., नागपूर यांचे पत्र क्र.जिपना/बांध/का-४(१)/निबा/०७, दिनांक- १३.११.२००७

**प्रस्तावना :-**

नागपूर जिल्हा परिषदेकडे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासाठी वर्गीकृत असे निवासस्थान उपलब्ध नसल्याने सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या निवासस्थानामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निवासाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकरीता वर्गीकृत असे निवासस्थान बांधण्याच्या दृष्टीने संदर्भीय पत्रान्वये प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावासोबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., नागपूर यांच्या निवासस्थानाच्या बांधकामाकरीता रु.४४,१२,०००/- किंमतीचे प्राथमिक अंदाजपत्रक सादर करण्यात आले असून, ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २००७-०८ मधील दरसूचीवर आधारीत आहे. सदर निवासस्थानासाठी मुख्य वास्तु शास्त्रज्ञ, सां.बां., मुंबई यांनी तयार केलेला क्र.T-RES/5154 हा नमुना नकाशा वापरण्यात आला असून, अनुज्ञेयतेनुसार एकूण २३७ चौ.मीटर क्षेत्रफळाचे बांधकाम प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रक व आराखडा उप विभागीय अभियंता, जि.प. (बांध), नागपूर यांनी तयार केला असून, कार्यकारी अभियंता व मु.का.अ., जि.प. यांनी साक्षांकित केलेला आहे.

सदर प्रस्तावाच्या तांत्रिक छाननी अंती रु.३५,१५,०००/- अंदाजपत्रकीय किंमतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**-: शासन निर्णय :-**

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निवासस्थानाच्या बांधकामासाठी येणाऱ्या एकूण रक्कम रु.३५,१५,०००/- (अक्षरी रुपये पस्तीस लक्ष पंधरा हजार फक्त) इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या बांधकामास पुढील अटींच्या अधिन राहून, या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

(i) बांधकामाच्या निविदा मागविण्याआधी सदर कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागातील संबधित सक्षम प्राधिकाऱ्याची त्वरेने तांत्रिक मान्यता घेण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल शासनास पाठवावा.

(ii) संबधित सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्याशिवाय बांधकामास सुरुवात करण्यात येवू नये.

(iii) प्रस्तुत इमारतीच्या प्रमाणभूत नमुन्यानुसार मान्य करण्यात आलेल्या बांधकामाच्या आराखड्यात शासनाच्या पुर्वमान्यते शिवाय कोणताही फेरबदल करु नये.

(iv) प्रस्तुतचे काम हाती घेतल्यापासून कोणत्याही परिस्थितीत जास्तीत जास्त चार वर्षात पूर्ण होईल, असे संबधित कार्यकारी अभियंता यांनी नियोजन करावे.

(v) प्रस्तुतच्या बांधकामाचा त्रैमासिक प्रगती अहवाल वेळीच शासनास पाठविण्याची संबधित कार्यकारी अभियंता यांनी दक्षता घ्यावी.

२. सदर निवासस्थानाच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकाचा सर्वसाधारण गोषवारा पुढीलप्रमाणे आहे:-

**GENERAL ABSTRACT**

| Sr. | Description | Amount |
|---|---|---|
| 1 | Construction of C E O Bunglow with R.C.C. Frame structure and R.C.C. Roof as per type drawing | Rs. 2643263.00 |
| 2 | Construction of approach road | Rs. 200000.00 |
| 3 | Rain Water Harvesting | Rs 50000.00 |
| 4 | Solar Water Heater | Rs. 50000.00 |
| 5 | External Water Supply | Rs. 100000.00 |
| 6 | Internal & External Electrification @ 11 % of build.cost | Rs. 291000.00 |
| | Total | Rs. 3445723.00 |
| 7 | Add 2% contingencies | Rs. 68914.00 |
| | Grand Total - | Rs. 3514637.00 |
| | **Say -** | **Rs. 3515000.00** |

३. उपरोक्त बांधकामासाठी संबधित सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर अनुदान स्वरुपात निधी उपलब्ध करुन दिला जाणार असून, तो उपलब्धतेनुसार अर्थसंकल्प वितरण प्रणाली (B D S) द्वारे वितरीत करण्यांत येईल.

४. यावरील खर्च "२५१५-इतर ग्रामीण विकास कार्यक्रम १०१, पंचायती राज ३१ सहाय्यक अनुदाने (०१) (०३) जिल्हा परिषदांच्या इमारती बांधकामासाठी जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (२५१५००५३) " या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

५. सदर प्रस्तावाची तांत्रिक छाननी मुख्य अभियंता (प्रमंग्रासयो) यांच्यामार्फत करण्यात आली आहे.

६. प्रस्तुतचा शासन निर्णय, वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग-पांच, अ.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यांत येत आहे.

७. प्रस्तुतचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर अपलोड करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्र.२००८०७०८१६३६२१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( चंद्रकांत ह. वडे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

C:\DO_RRD_PARA7\BLDG PROPOSALCR 211_CEONagpurQurter

प्रत,
१) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
२) महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर.
४) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर.
५) कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, नागपूर.
६) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा नागपूर.
७) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
८) उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नागपूर विभाग, नागपूर.
९) जिल्हा लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नागपूर.
१०) वित्त विभाग (व्यय १५/अर्थ.१६), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
११) नियोजन विभाग (का.क्र.१४११/१४७४) मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१२) सार्वजनिक बांधकाम विभाग, इमारती-३, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१३) का.क्र.वित्त-१ व योजना-७, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) निवड नस्ती, कार्यासन क्र.पं.रा.७, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.